# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला
दिनांक – १४.०७.२०२६

## पंचायत समिती तेल्हारा, जि. अकोला येथील सहायक कार्यक्रम अधिकारी यांना A.C.B. अकोला पथकाने रू. ६,०००/– लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडले

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे तक्रारदार यांनी समक्ष येवुन तक्रार नोंद केली की, तक्रारदार हे कंस्ट्रक्शनचे कामकाज करीत असुन सन २०२३–२४ मध्ये ग्रामपंचायत पिवंदळ खुर्द ता. तेल्हारा जि. अकोला येथील आर.सी. मातोश्री पांदण रस्ता श्री. तुषार तळोकार ते नांदखेड रोड पर्यंत हा रस्ता मा. गट विकास अधिकरी, पं.स. तेल्हारा जि. अकोला यांचेकडून मंजुर होवून ग्राम पंचायत कार्यालय, पिवंदळ खुर्द यांचेकडे आला होता. सदर पांदण रस्त्याचे काम ग्रामपंचायत पिवंदळ खुर्द यांनी पुर्ण केलेले आहे. सदर कामावर लागणारे साहीत्य तक्रारदारामार्फत पुरवठा केलेला असुन सदर साहीत्याचे एकुण रू. १४,७८,०००/– चे देयक ग्रामपंचायत कार्यालयास सादर केलेले आहे. सदर कामावर पुरवठा केलेल्या साहीत्याचे देयक मिळणे करीता पंचायत समिती तेल्हारा, जि. अकोला येथील श्री. सदापुरे, तांत्रीक सहायक व श्री. झाडोकार, एपीओ हे पांदण रस्त्याच्या कामाचे देयके सादर करण्याचे काम करीत असल्याने त्यांना बिलासंबंधी विचारणा केली असता, त्यांनी सदर कामाचे देयक काढून देण्यास मदत करण्याकरीता रू. ७,०००/– ची मागणी केली. तसेच सदरचे देयक काढून दिल्यानंतर श्री. सदापुरे, व श्री. झाडोकार यांनी तक्रारदार याचेकडे स्वत:करीता १४ लाखाचे एक–एक टक्याप्रमाणे रू. १४,०००/– लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सापळा अधिकारी यांनी लाचेची मागणी बाबत पडताळणी कारवाई दि. ०८/०७/२०२६ रोजी केली असता, यातील आरोपी १) श्री. संदिप विजय झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली रू. ६०००/– लाच रकमेची मागणी केली तसेच आरोपी क्र. २) श्री. शिरीष सदापुरे, तांत्रीक सहायक, यांनीसुध्दा लाच रक्कमेची मागणी करून लाच रकमेच्या व्यवहारास प्रोत्साहन दिले. त्यावरून दिनांक १४.०७.२०२६ रोजी सापळा कारवाई वेळी आरोपी १) श्री. संदिप विजय झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी यांनी आर के बार गार्डन अॅन्ड रेस्टॉरंट, ता. तेल्हारा, जि. अकोला येथे तक्रारदार यांचेकडुन रू. ६,०००/– लाच रक्कम स्वत: स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. आरोपी क्र. १) श्री. संदिप विजय झाडोकार, सहायक कार्यक्रम अधिकारी तसेच आरोपी क्र. २) श्री. शिरीष सदापुरे, तांत्रीक सहायक, पंचायत समिती, तेल्हारा जि. अकोला यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरूध्द पोलीस स्टेशन तेल्हारा, जि. अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदर कार्यवाही मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), यांचे मार्गदर्शनाखाली तसेच मा. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, अकोला (९१५८८२२६७६) यांच्ये पर्यवेक्षणाखाली श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. अकोला यांचे सोबत, श्री. अतुल इंगोले, पोलीस निरीक्षक पोलीस हवालदार डिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, म.पो.हवा. अर्चना घोडेस्वार, संदिप ताले, गोपाल किरडे सर्व ला.प्र.वि. अकोला यांनी केलेली आहे.

अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या जिल्हांतील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी/लोकसेवक यांनी किंवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर शासकीय शुल्का व्यतिरिक्त लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे संपर्क साधावा. तक्रारदार यांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करण्यात येईल व तक्रारदार यांचे सापळा कारवाईत वापरण्यात आलेली रक्कम ही १ महिण्याचे आत परत केल्या जाईल. तसेच तक्रारदाराचे शासकीय विभागात अडकलेले वैध कामही पुर्ण करून दिले जाईल.

### लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.क्र. ९०११३२३४२६
२) मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि, अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.क्र. ९७६४२१०४८५
३) मा. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि. अकोला ९१५८८२२६७६
४) कार्यालय क्रमांक :– ०७२४–२४१५३७०,
५) टोल फ्रि क्रमांक :– १०६४,
६) मोबाईल क्रमांक :– ९४०३८०१०६४

(प्रविण ज. वेरूळकर)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला